नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ रे Year - 4rd | अंक - १४ Issue - 14 | वार - सोमवार दि. ८ जून २०२६ Blow- Monday Date 8 JUNE 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## देशांतर्गत एलपीजी महागला

### जगाच्या तुलनेत भारतात स्वस्तच; पण सर्वसामान्यांना बसणार फटका

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : गेल्या काही दिवसांपासून देशभरात दैनंदिन वापरातील आणि जीवनावश्यक वस्तूंचे दर वाढत असताना रविवारी केंद्र सरकारने सर्वसामान्य जनतेला आणखी एक झटका दिला आहे. रविवारी सकाळपासून घरगुती वापराच्या एलपीजी गॅस सिलेंडरच्या दरात मोठी वाढ करण्यात आली आहे. त्यानुसार एलपीजी सिलेंडरचा भाव २९ रुपयांनी वाढला आहे. यामुळे 'कॉमन मॅन'च्या घरातील किचन बजेट कोलमडणार आहे. ही दरवाढ १४.२ किलोच्या सिलिंडरवर करण्यात आली आहे. महत्वाचे म्हणजे गेल्या तीन महिन्यांत एलपीजीच्या किमतीत दुसऱ्यांदा वाढ झाली आहे. या दरवाढीनंतर, आता दिल्लीत १४.२ किलोच्या सिलिंडरची किंमत ९१३ रुपयांवरून ९४२ रुपयांवर पोहोचली आहे. देशातील इतर भागांतही २९ रुपयांचीच वाढ झाली आहे.



पश्चिम आशियातील भू-राजकीय संकट आणि इराण-अमेरिका-इस्रायल दरम्यान भडकलेल्या युद्धामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कच्च्या मालाच्या किमती गगनाला भिडल्या आहेत. या जागतिक दबावामुळे देशातील सरकारी तेल कंपन्यांनी रविवारपासून घरगुती एलपीजी सिलेंडरच्या दरात २९ रुपयांची वाढ केली आहे.

चालू वर्षातील ही दुसरी मोठी दरवाढ असून, यामुळे सर्वसामान्यांच्या स्वयंपाकघराचे बजेट कोलमडले आहे. असे असले तरी, केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक गॅस मंत्रालयाने स्पष्ट केले आहे की, जागतिक संकटाच्या तुलनेत भारतातील घरगुती गॅसचे दर शेजारील देश आणि अमेरिका, कॅनडासारख्या प्रगत अर्थव्यवस्थांपेक्षा अजूनही खूप कमी आहेत.

घरगुती गॅसच्या दरवाढीमुळे मुंबईतील १४.२ किलोच्या एलपीजी सिलेंडरचा दर ९१२.५० रुपयांवरुन ९४१.५० रुपयांवर जाऊन पोहोचला आहे. यापूर्वी ७ मार्चला घरगुती गॅस सिलेंडरच्या दरात ६० रुपयांची वाढ झाली होती. त्यानंतर आता २९ रुपयांची दरवाढ झाली आहे. पेट्रोल-डिझेल व दैनंदिन वापरातील अन्य वस्तूंच्या महागाईमुळे सामान्य माणूस अगोदरच मेटाकुटीला आला असताना एलपीजी गॅसच्या दरवाढीमुळे सर्वसामान्यांच्या अडचणीत आणखीनच भर पडणार आहे. एलपीजी गॅसचे उत्पादन करणाऱ्या सरकारी कंपन्या अजूनही प्रत्येक घरगुती सिलेंडरमागे ७०३ रुपयांचा तोटा सहन करत आहेत. त्यामुळे आगामी काळात घरगुती गॅस सिलेंडरचे भाव आणखी वाढण्याची भीती वर्तविली जात आहे.

काही दिवसांपूर्वीच पेट्रोलियम कंपन्यांनी व्यावसायिक वापराच्या एलपीजीच्या (उेाशीलळरश्र डझॠ ीरींश) दरात वाढ केली होती. १ जून रोजी कमर्शियल एलपीजी गॅस सिलेंडरचे दर ४२ रुपयांनी वाढला होता. गेल्या पाच महिन्यात १९ किलोच्या सिलेंडरचे दर दुप्पट झाले आहेत. १ जानेवारीपूर्वी १९ किलोच्या सिलेंडरचा दर १५८० रुपये होता. १ जूनला तोच दर आता ३११३.५० रुपयांवर पोहोचला आहे. म्हणजेच १९ किलोच्या एलपीजीच्या दरात दुप्पट वाढ झाली आहे. १९ किलोच्या एलपीजी सिलेंडरच्या दरात जानेवारी महिन्यात १११ रुपये, फेब्रुवारीत ४९ रुपये, मार्चमध्ये २८ रुपये, ७ मार्चला ११४.५० रुपये, एप्रिल महिन्यात १९५.५० रुपये, मे महिन्यात ९९३ रुपये आणि जून महिन्यात ४२ रुपयांची वाढ झाली आहे. त्यामुळे हॉटेल आणि खाद्यपदार्थांचे दर वाढले होते. दिवसेंदिवस वाढत चाललेल्या या महागाईमुळे सर्वसामान्यांच्या चिंता वाढत आहेत. पेट्रोल-डिझेल, गॅस व अन्नधान्याचे दर सातत्याने वाढत आहेत. आगामी काळात पावसाने ओढ दिल्यास महागाई आणखी वाढण्याची शक्यता आहे.

## 'स्फोटके नियम २००८' मध्ये सुधारणेसाठी केंद्राला प्रस्ताव सादर करणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नागपूर : नागपूर जिल्ह्यात मागील अडीच वर्षात स्फोटकांच्या कंपन्यांमधील अपघातांमध्ये जीवितहानीच्या घटना लक्षात घेता 'स्फोटके नियम २००८' मध्ये सुधारणा सुचविणारा प्रस्ताव राज्य शासन केंद्राला सादर करणार आहे. या प्रस्तावाच्या मसुद्यात जीवितहानी टाळण्यासाठी कंपन्यांमध्ये स्वयंचलित प्रक्रियेसह सुरक्षेशी संबंधित जागतिक मानकांचा अवलंब करण्याच्या शिफारसी सुचविण्यात आल्या आहेत.

### जीवितहानी टाळण्यासाठी स्वयंचलित यंत्रणेवर भर; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर सादरीकरण

आज रामगिरी येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर जिल्हा पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार यांच्या नेतृत्वाखालील अभ्यासगटाने या मसुद्याचे सादरीकरण केले. यात राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालयाचे तज्ज्ञ तसेच स्फोटके निर्मिती करणाऱ्या कंपनीच्या प्रतिनिधींचा प्रामुख्याने समावेश होता.

अभ्यासगटाने प्रस्तावाच्या मसुद्यात अनेक शिफारसी सुचविल्या आहेत. त्यात प्रामुख्याने स्फोटकांच्या निर्मिती प्रक्रियेतील जोखीम कमी करण्यासाठी ती जास्तीत जास्त प्रमाणात स्वयंचलित करण्यात यावी व त्यासाठी रोबोट्सचा वापर करावा, प्रत्यक्ष जोखमीच्या प्रक्रियेच्या जागी कमीतकमी मनुष्यबळ उपस्थित राहील, हे सुनिश्चित करावे, तसेच त्यासाठी सुरक्षेशी संबंधित जागतिक मानकांचा आधार घेण्यात यावा, या प्रमुख शिफारसींचा समावेश आहे. या शिफारसींना अनुसरून स्फोटके नियम २००८ मध्ये सुधारणा प्रस्तावित केल्या जाणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूर जिल्ह्यातील स्फोटकांच्या कंपन्यांमधील अपघातांच्या घटनांची अत्यंत गंभीर दखल घेऊन स्फोटकांशी संबंधित नियमात आवश्यक त्या सुधारणा करण्याचा प्रस्ताव केंद्र सरकारला पाठविण्याचे सूतोवाच केले होते. याअनुषंगाने अभ्यास करण्याच्या सूचना त्यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार यांना दिल्या होत्या. त्यानंतर पोलीस अधीक्षकांच्या नेतृत्वातील अभ्यासगटाने यासंदर्भात विविध घटकांशी चर्चा करून नियमातील प्रस्तावित सुधारणांचा एक मसुदा तयार केला आहे. या प्रस्तावित मसुद्याचे सादरीकरण आज मुख्यमंत्र्यांसमोर करण्यात आले.

जिल्हा पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार यांनी सादरीकरण केले. यावेळी अभ्यास गटाचे राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालयाचे संचालक ए.आर. सोनटक्के, सहाय्यक संचालक गगन उपाध्याय आणि कंपन्यांचे प्रतिनिधी आदी उपस्थित होते.

## मुंबई विमानतळावर डीआरआयची कारवाई, ५ कोटींचे सोने जप्त; ७ अटकेत

मुंबई : मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर महसूल गुप्तचर संचालनालयाने सोन्याच्या आंतरराष्ट्रीय तस्करांविरुद्ध एक मोठी कारवाई केली आहे. 'ऑपरेशन गोल्डन नेक्सस' अंतर्गत डीआरआयने केलेल्या या कारवाईत सुमारे ३.२ किलो परदेशी सोन्याची धूळ (वॅक्स स्वरूपात) जप्त केली असून, आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत तिची किंमत अंदाजे ५ कोटी रुपये आहे. या प्रकरणात विमानतळ कर्मचाऱ्यांसह एकूण ७ जणांना अटक करण्यात आली आहे.डीआरआयच्या माहितीनुसार, या आंतरराष्ट्रीय टोळीने सोन्याच्या तस्करीसाठी एक नवीन साखळी (रॅकेट) तयार केली होती. बँकॉकहून मुंबईमार्गे प्रवास करणारे परदेशी नागरिक आपल्या शरीरात हे सोने (वॅक्स स्वरूपात) लपवून आणत असत. विमानतळावर उतरल्यानंतर कस्टम्स आणि सुरक्षायंत्रणांच्या नजरेतून वाचण्यासाठी ते विमानतळावरील स्थानिक कर्मचाऱ्यांची मदत घेत असत.

एअरपोर्टचे कर्मचारीच निघाले तस्करांचे साथीदार

या कारवाईचे सर्वात धक्कादायक वैशिष्ट्य म्हणजे तस्करांना मदत करणारे विमानतळावरील कर्मचारीच निघाले. यामध्ये बांगलादेशी आणि श्रीलंकन नागरिकांचा समावेश आहे, जे सोने वाहून आणण्याचे (कॅरिअर) काम करत होते. यामध्ये विमानतळावरील दोन बस चालक आणि एका कोच मॉनिटरचा समावेश आहे.

सोने स्वीकारणारा एजंट स्थानिक

मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे डीआरआयने सापळा रचला होता. विमानतळ परिसरामध्ये दोन बस चालक आणि एक कोच मॉनिटर हे परदेशी नागरिकांकडून घेतलेली सोन्याची डिलिव्हरी स्थानिक एजंटला देत असतानाच अधिकाऱ्यांनी त्यांना रंगेहात पकडले.

पुढील तपास सुरू

डीआरआयने ही संपूर्ण सोन्याची जप्ती कस्टम्स कायदा, १९६२ अंतर्गत केली आहे. या कारवाईमुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर चालणारी सोन्याच्या तस्करीची एक मोठी साखळी उद्ध्वस्त करण्यात भारतीय यंत्रणांना यश आले आहे. हे सोने मुंबईत नेमकं कोणाला दिले जाणार होते आणि या मागे आणखी कोणती मोठी नावे आहेत, याचा सखोल तपास सध्या डीआरआयचे अधिकारी करत आहेत.

## सार्वजनिक वाहतुकीचा वापर करा : पंतप्रधान मोदी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : पश्चिम आशियातील वाढता संघर्ष, ऊर्जा बाजारातील चढ-उतार आणि जागतिक आर्थिक अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर भारताच्या आर्थिक विकासाचा वेग कायम राखण्यासाठी शनिवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली आर्थिक सल्लागार परिषदेची उच्चस्तरीय बैठक पार पडली. या बैठकीत पंतप्रधानांनी देशांतर्गत अर्थव्यवस्थेची ताकद वाढवण्यासाठी 'आत्मनिर्भरते'चे महत्त्व पुन्हा अधोरेखित केले. इंधनाची बचत करण्यासाठी आणि परकीय चलनसाठ्यावरील दबाव कमी करण्यासाठी नागरिकांनी सार्वजनिक वाहतुकीचा अधिक वापर करावा, असे आवाहन पंतप्रधान मोदी यांनी यावेळी केले.बैठकीनंतर सोशल मीडियावरून माहिती देताना पंतप्रधान म्हणाले, देशातील आर्थिक स्थित्यंतरे आणि दीर्घकालीन विकासाच्या प्राधान्यक्रमांवर बैठकीत सखोल चर्चा झाली. आर्थिक सुधारणांच्या प्रक्रियेला अधिक गती देणे, 'ईझ ऑफ लिविंग' (सर्वसामान्यांचे जीवन सुकर करणे) आणि 'ईझ ऑफ डुइंग बिझनेस' (व्यापार सुलभता) सुनिश्चित करण्याबाबत मी माझे विचार मांडले.



या बैठकीत प्रामुख्याने पश्चिम आशियातील संकटामुळे जागतिक ऊर्जा पुरवठ्यात निर्माण झालेली अनिश्चितता, कच्च्या तेलाच्या किमतींमधील चढ-उतार आणि जागतिक घडामोडींमुळे वाढणारी महागाई यावर सखोल विचारमंथन करण्यात आले. तसेच, जागतिक पातळीवर पुरवठा साखळीत येणारे अडथळे आणि बाह्य अनिश्चितता कायम असली, तरी भारताची अंतर्गत अर्थव्यवस्था गुंतवणूक व विकासासाठी आजही मोठ्या संधी उपलब्ध करून देत असल्याचे मत परिषदेच्या सदस्यांनी व्यक्त केले.देशात परकीय भांडवलाचा प्रवाह वाढवण्यासाठी केंद्र सरकारने एक मोठा आर्थिक निर्णय घेतला आहे. सरकारी रोख्यांमध्ये गुंतवणूक करणाऱ्या परदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदारांसाठी कर रचनेत मोठे सुधार लागू करण्यात आले आहेत. या नव्या निर्णयानुसार, विदेशी गुंतवणूकदारांना अशा गुंतवणुकीतून मिळणाऱ्या व्याज उत्पन्नावर किंवा भांडवली नफ्यावर आयकरातून पूर्ण सूट देण्यात आली आहे. या सवलतीत १५, ३० आणि ४० वर्षांच्या मुदतीच्या नवीन सरकारी रोख्यांसह, 'फुली क्सेसिबल रूट' अंतर्गत येणाऱ्या सार्वभौम हरित रोख्यांमधील गुंतवणुकीचाही समावेश करण्यात आला आहे. रिझर्व्ह बँकेने आपल्या ताज्या द्वैमासिक आर्थिक पुनरावलोकनात जागतिक भू-राजकीय संकट, पुरवठा साखळीतील विस्कळीतपणा आणि मान्सूनबाबतची चिंता लक्षात घेऊन चालू आर्थिक वर्ष २०२६-२७ साठीचे महत्त्वाचे अंदाज सुधारले आहेत. आरबीआयने देशाच्या विकासदराचा अंदाज ६.९ टक्क्यांवरून घटवून ६.६ टक्के केला आहे. किरकोळ महागाईचा अंदाज ४.६ टक्क्यांवरून वाढवून ५.१ टक्के केला आहे.




## संपादकीय....

### अडचणीत वाढ

गेल्या काही दिवसांपासून देशभरात दैनंदिन वापरातील आणि जीवनावश्यक वस्तूंचे दर वाढत असताना रविवारी केंद्र सरकारने सर्वसामान्य जनतेला आणखी एक झटका दिला आहे. घरगुती वापराच्या एलपीजी गॅस सिलेंडरच्या दरात मोठी वाढ करण्यात आली आहे. त्यानुसार एलपीजी सिलेंडरचा भाव २९ रुपयांनी वाढला आहे. यामुळे 'कॉमन मॅन'च्या घरातील किचन बजेट कोलमडणार आहे. ही दरवाढ १४.२ किलोच्या सिलिंडरवर करण्यात आली आहे. महत्वाचे म्हणजे गेल्या तीन महिन्यांत एलपीजीच्या किमतीत दुसऱ्यांदा वाढ झाली आहे. या दरवाढीनंतर, आता दिल्लीत १४.२ किलोच्या सिलिंडरची किंमत ९१३ रुपयांवरून ९४२ रुपयांवर पोहोचली आहे. देशातील इतर भागांतही २९ रुपयांचीच वाढ झाली आहे. घरगुती गॅसच्या दरवाढीमुळे मुंबईतील १४.२ किलोच्या एलपीजी सिलेंडरचा दर ९१२.५० रुपयांवरुन ९४१.५० रुपयांवर जाऊन पोहोचला आहे. यापूर्वी ७ मार्चला घरगुती गॅस सिलेंडरच्या दरात ६० रुपयांची वाढ झाली होती. त्यानंतर आता २९ रुपयांची दरवाढ झाली आहे. पेट्रोल-डिझेल व दैनंदिन वापरातील अन्य वस्तूंच्या महागाईमुळे सामान्य माणूस अगोदरच मेटाकुटीला आला असताना एलपीजी गॅसच्या दरवाढीमुळे सर्वसामान्यांच्या अडचणीत आणखीनच भर पडणार आहे. एलपीजी गॅसचे उत्पादन करणाऱ्या सरकारी कंपन्या अजूनही प्रत्येक घरगुती सिलेंडरमागे ७०३ रुपयांचा तोटा सहन करत आहेत. त्यामुळे आगामी काळात घरगुती गॅस सिलेंडरचे भाव आणखी वाढण्याची भीती वर्तविली जात आहे. काही दिवसांपूर्वीच पेट्रोलियम कंपन्यांनी व्यावसायिक वापराच्या एलपीजीच्या दरात वाढ केली होती.

# पंढरपूर तालुका पोलिसांची मोठी कारवाई; खुनातील दोन आरोपींच्या मुस्क्या आवळल्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुका पोलिसांची धडाकेबाज मोठी कारवाई कुणातील दोन आरोपींच्या पोलिसांनी मोजक्या आवळ्या आहेत कोणाचा गुन्हा केला ४८ तासात उघड,

गु.रा नंबर ४२६ / २०२६ भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम १०३ (१,) प्रमाणे दिनांक २/६/२०२६ रोजी दुपारी २.३० वाजता दाखल होता.

सदर होण्याच्या तपासात अनुषंगाने वेगवेगळ्या तीन टीम तयार करून पंढरपूर तालुका पोलिसांनी गुन्हे तपासात केला आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर.

पुण्यातील मयताची ओळख पटवून घटनास्थळाची आजूबाजूची सीसीटीव्ही फुटेज सी.डी.आर. एस.डी.आर. च्या तांत्रिक पद्धतीने तसेच वेळोवेळी माननीय सहाय्यक पोलीस अधीक्षक साहेब श्री प्रशांत डगळे साहेब पंढरपूर विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली घेऊन कौशल्यपूर्ण गोपनीय माहितीच्या आधारे संशयतांचे ठाण ठिकाण व जमिनीच्या इतर व्यवहारात माहिती काढून संशोसास ताब्यात घेतल्यानंतर त्यास विश्वासात घेऊन विचारपूस केली असता. प्रथम त्यांनी उडवा उडवी ची उत्तरे दिली तरी देखील त्यास विश्वासात घेऊन सखोल तपास केला असता.

त्यांनी माहिती देऊन ललिता दत्तात्री सोळगे व रमेश मोठे असे दोघेजण अनवली फाटा ते नारायण चिंचोली या ठिकाणी मंदिरामध्ये हरिपाठ साठी आले होते तिथे आल्यानंतर त्यांनी हरिपाठ समताच ललिता लोणी लोळगे व भारत माने हे एका मोटरसायकलवर रुपये इकडे निघून गेले आणि त्यानंतर रमेश मोठे यांनी त्यांच्या पाठोपाठ पाटला केला आणि ज्या शेतात त्यांनी थांबले त्या शेतात त्यांनी जाऊन ललिता लोळगे व रमेश मोठे यांनी हत्याराने भारत माने यांना डोक्यात आणि इतर ठिकाणी गुप्तांगावर जोरात वार करून गंभीर करून मारहाण करून त्यातच त्यांचा मृत्यू झाला आणि त्या ठिकाणी त्यांनी सर्व पुरावे नष्ट करून निघून पळून गेले आणि असा बनाव केला की त्या ठिकाणी ललिता कोळंगे व श्री गणेश वाडी येथे मंगळा तालुक्यात राहणारी आहे व तिचा आणि महेश भारत माने यांचा कुठेही लोकांमध्ये संपर्क होऊ दिला नाही त्यामुळे ३१ मार्च रोजी संपर्क होऊ दिला नाही त्यामुळे गुपचूप रात्रीच्या अंधारात फायदा घेऊन ललिता लोळगे रमेश मोठे यांनी प्लॅनिंग करून भारत माने यांचा खून करून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला परंतु पंढरपूर तालुका पोलिसांनी सुरुवातीला यांच्यामध्ये कोणाचेही नाव निष्पन्न नसताना अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल असताना पंढरपूर तालुका पोलिसांनी मोहोळ पासून पेनुर टोल नाका त्यानंतर टेंभुर्णी येथील टोलनाका त्यानंतर निमगाव येथील टोल नाका व नारायण चिंचोली दुर्गादेवी टोल नाका गावातील सीसीटीव्ही फुटेज कलेक्ट केले व त्या त्या सीसीटीव्ही मिलिंद मोमेंट त्यांनी पडताळून पाहिली त्याचप्रमाणे ज्या ज्या ठिकाणी थांबले त्या ठिकाणचे कॅमेरा व त्यांचे पत्नीकडून माहिती घेतली व त्यांचा भारत माने यांचा शेतीसाठी कोणाचा वाद आहे का याबाबत देखील पडताळणी केली त्यातून शास्त्रोक्त पद्धतीने तपास करून आरोपी रमेश धोंडीराम मोठे वय ४५ राणा नरखेड व महिला आरोपी ललिता कोळंगे वय ४३ वर्षे राहणार गणेश वाडी मंगळवेढा, दोन्ही आरोपींना सदर खुणेच्या प्रसंगी ५ जून २०२६ रोजी अटक करण्यात आली आहे.



सदर कुणाचा गुन्हा उघडकीस आला आहे सदरची कामगिरी माननीय पोलीस अधीक्षक साहेब श्री अतुल कुलकर्णी साहेब माननीय अप्पर पोलीस अधीक्षक साहेब श्री विजय कबाडे साहेब माननीय सहाय्यक पोलीस अधीक्षक श्री प्रशांत डगळे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी वाय मुजावर पोलीस उपनिरीक्षक भारत भोसले विक्रम बडने पोलीस हवालदार साजन भोसले दीपक भोसले सुहास देशमुख पोलीस कॉन्स्टेबल इरफान शेख सहाय्यक पोलीस फौजदार जनार्दन करे पोलीस हवालदार मंगेश रोकडे पोलीस हवालदार स्वप्निल वाडदेकर पोलीस कॉन्स्टेबल विजयकुमार आवटी, पोलीस कॉन्स्टेबल हसन नदाफ चालक पोलीस पाय्टेबल महेश गोडसे राजाभाऊ साठे महिला पोलीस हवालदार सुवर्णा कदम सायबर सेलचे पोलीस हवालदार रतन जाधव व महिला पोलीस अंमलदार ननवरे मॅडम यांच्या पथकाने सदरची कारवाई केली आहे.

# आंतरराष्ट्रीय परिषदेत नाशिकच्या विशेष शिक्षिकेच्या संशोधनाला मान्यता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार यांच्या प्रेरणेने तसेच शिक्षणाधिकारी (योजना )सरोज जगताप, शिक्षणाधिकारी प्राथमिक साईलता सामलेटी यांच्या मार्गदर्शनाखाली दिव्यांग विद्यार्थ्यांच्या प्रारंभिक निदान, शीघ्र हस्तक्षेप (एरीश्रू खपींर्शींशिपींळेप) व गुणवत्तापूर्ण समावेशित शिक्षण या विषयावर आधारित दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद जानेवारी २०२६ मध्ये आयआयटी मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. या परिषदेचे आयोजन सिकंदराबाद व मुंबई येथील संस्थांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते.या परिषदेमध्ये भारतासह २२ देशांतील सुमारे ५५० संशोधक, दिव्यांग शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ, विविध संस्थांचे प्रतिनिधी आणि शैक्षणिक अभ्यासक सहभागी झाले होते. यापैकी निवडक ५० संशोधन पेपर आणि पोस्टर सादरीकरणासाठी निवड करण्यात आली होती.समग्र शिक्षा, जिल्हा परिषद नाशिक अंतर्गत ग्रामीण, पाडा व अतिदुर्गम भागातील दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचे संशोधनात्मक सादरीकरण करण्याची संधी विजया अवचार, विशेष शिक्षक, केंद्र – ओझर टाउनशिप, ता. निफाड यांना प्राप्त झाली. त्यांनी ० ते ६ वयोगटातील दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शीघ्र हस्तक्षेप व निदान प्रक्रियेत शिक्षकांची भूमिका या महत्त्वपूर्ण विषयावर संशोधन अहवाल व पोस्टर सादर केले.या संशोधनामध्ये प्रारंभिक स्तरावर योग्य निदान आणि शीघ्र हस्तक्षेप केल्यास दिव्यांग विद्यार्थ्यांच्या बौद्धिक, सामाजिक, भाषिक आणि शैक्षणिक विकासाला मोठी चालना मिळते, हा वैज्ञानिक दृष्टिकोन मांडण्यात आला. विशेषतः ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांपर्यंत समावेशित शिक्षणाच्या प्रभावी सेवा पोहोचविण्यात शिक्षकांची भूमिका किती महत्त्वपूर्ण आहे, याचे सखोल विश्लेषण करण्यात आले.सदर संशोधन सादरीकरण महाराष्ट्र राज्याचे दिव्यांग कल्याण सचिव तुकाराम मुंढे यांच्या उपस्थितीत पार पडले. यावेळी त्यांनी नाशिक जिल्ह्यात समावेशित शिक्षण अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या नाविन्यपूर्ण उपक्रमांचे कौतुक करत संशोधन कार्याचे अभिनंदन केले. संशोधनाधारित शैक्षणिक कार्य ही काळाची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले. विविध संशोधकांच्या संशोधन लेखांचा समावेश असलेल्या पुस्तकाचे प्रकाशन त्यांच्या हस्ते करण्यात आले.

> **आय आय टी मुंबई येथे दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शीघ्र हस्तक्षेप विषयावरील संशोधन सादर**

विशेष बाब म्हणजे, महाराष्ट्रातून समग्र शिक्षाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या जिल्हा परिषद नाशिकच्या विजया अवचार या एकमेव प्रतिनिधी होत्या. त्यामुळे नाशिक जिल्ह्यातील समावेशित शिक्षण क्षेत्रातील कार्याला राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर विशेष मान्यता मिळाली आहे.या उल्लेखनीय यशाबद्दल निफाडचे गटशिक्षणाधिकारी विलास साळी यांनी अभिनंदन करत समावेशित शिक्षण विभागासाठी ही अभिमानास्पद बाब असल्याचे सांगितले. यावेळी विजया अवचार यांना प्रकाशित संशोधन पुस्तक, प्रमाणपत्र व अभिनंदनपत्र देऊन गौरविण्यात आले.या यशाचे श्रेय त्यांनी पंचायत समिती निफाडचे गटशिक्षणाधिकारी विलास साळी, गटसमन्वयक/विस्तार अधिकारी लता भरसट, विस्तार अधिकारी कैलास बोरसे, कार्यालयीन अधीक्षक गणेश भुजबळ, सर्व केंद्रप्रमुख, विषयतज्ज्ञ, विशेष शिक्षक, ओझर टाउनशिप केंद्रातील मुख्याध्यापक, सहकारी शिक्षकवृंद तसेच जि. प. प्राथमिक शाळा ओझर टाउनशिप क्र. २ चे मुख्याध्यापक नरसिंगे सर यांच्यासह सर्व सहकाऱ्यांना दिले.दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संशोधनाधारित समावेशित शिक्षण, शीघ्र हस्तक्षेप आणि गुणवत्तापूर्ण अध्यापनाच्या माध्यमातून ग्रामीण स्तरावर सकारात्मक बदल घडवून आणण्याचा हा प्रयत्न भविष्यातील शैक्षणिक धोरणांसाठी दिशादर्शक ठरेल, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

## जर्मनीत आंतरराष्ट्रीय स्वाभिमानी मराठा महासंघाचा स्थापना दिवस उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर/केतन भोज : ६ जून रोजी शिवराज्याभिषेक दिन आणि आंतरराष्ट्रीय स्वाभिमानी मराठा महासंघाच्या स्थापना दिनाचे औचित्य साधून महासंघाचे संस्थापक, छत्रपती भूषण, प्रखर मराठा व क्षत्रिय आंदोलक तथा ख्यातनाम व्याख्याते डॉ. कृषीराज टकले पाटील यांच्या मार्गदर्शनाने तसेच जर्मनी येथील रणजित सिंह यांच्या नेतृत्वाखाली भव्य स्वरूपात वर्धापन दिन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. परदेशातील भूमीवर छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा आणि महासंघाच्या ध्येय-धोरणांचा जयजयकार



करत हा वर्धापन दिन अत्यंत दिमाखात साजरा करण्यात आला. यावेळी मराठा महासंघाचा झेंडा जर्मनीमध्ये मोठ्या डौलाने आणि अभिमानाने फडकविण्यात आला. या ऐतिहासिक सोहळ्याला आंतरराष्ट्रीय स्वाभिमानी मराठा महासंघाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीतील अनेक प्रमुख पदाधिकाऱ्यांची विशेष उपस्थिती लाभली. जर्मनीमध्ये राहणाऱ्या मराठी आणि भारतीय बांधवांना एकत्र करत रणजित सिंह यांनी या कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन केले होते. याप्रसंगी डॉ. कृषीराज टकले पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महासंघाचे कार्य जागतिक पातळीवर विस्तारण्याचा आणि शिवरायांचा गौरवशाली इतिहास सातासमुद्रापार पोहोचविण्याचा संकल्प करण्यात आला. परकीय भुमीवर पार पडलेल्या या दिमाखदार सोहळ्यामुळे जगभरातील शिवप्रेमींमध्ये आनंदाचे व अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

जागतिक स्तरावरील महासंघाच्या या गौरवशाली चळवळीत आणि कार्यात सहभागी व्हायचे असल्यास शिवप्रेमींनी ७५८८११५९३२ या क्रमांकावर 'जय भवानी, जय शिवराय, जय स्वाभिमानी' लिहून आपला सविस्तर परिचय पाठवावा, असे आवाहन महासंघाच्या वतीने करण्यात आले आहे.

## निफाडला नगरपंचायतच्या वतीने वृक्षारोपण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड नगरपंचायत मार्फत आज जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधुन वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी मुख्याधिकारी यांनी उपस्थितांना माझी वसुंधरा तसेच पर्यावरण विषयक बहुमोल असे मार्गदर्शन केले. वृक्षारोपण निमित्त यावेळी सर्वांनी समाधान व्यक्त केले. माझी वसुंधरा अभियान अंतर्गत शहरातील सटुआई मंदिराजवळ, राजीव गांधी नगर, निफाड या ठिकाणी निफाड नगरपंचायतीच्या नगरअध्यक्षा सौ. कांताबाई अशोक कर्डिले, उपनगराध्यक्ष अनिल पा. कुंदे , मा. नगरसेवक तसेच




मुख्याधिकारी . धिरज भामरे यांचे मार्गदर्शनाखाली हे वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी शहरातील जेष्ठ नागरिक सुभाष गाजरे , इतर नागरिक, विद्यार्थी निफाड नगरपंचायत अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**पावसाळ्याच्या पूर्वतयारीसाठी मोठ्या प्रमाणात खरेदी; लाखोंची उलाढाल**

**ग्रामीण अर्थव्यवस्थेतील केंद्रस्थानी असलेली भूमिका अधोरेखित**

# पडघा आठवडा बाजारात सुकी मच्छी खरेदीसाठी नागरिकांची उसळली गर्दी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील पडघा हे परिसरातील अनेक खेड्यापाड्यांचे प्रमुख व्यापारी केंद्र म्हणून आेळखले जाते. येथील रविवारचा आठवडा बाजार हा विशेषतः सुकी मच्छी विक्रीसाठी प्रसिद्ध असून, पावसाळा तोंडावर आल्याने यंदाही बाजारात ग्राहकांची प्रचंड गर्दी पाहायला मिळाली. भिवंडीसह कल्याण, शहापूर, वाडा, मुरबाड, कसारा, अंबाडी तसेच इतर तालुक्यांतील नागरिकांनी मोठ्या संख्येने बाजारात हजेरी लावून सुकी मच्छीची खरेदी केली. पावसाळ्यात समुद्रातील मच्छीमारी बंद राहते. त्यामुळे ताजी मासळीची उपलब्धता कमी होते. याच पार्श्वभूमीवर अनेक कुटुंबे





पावसाळ्यासाठी सुकी मच्छीचा साठा करून ठेवतात. त्यामुळे पडघा आठवडा बाजारात सुकी मच्छीच्या विक्रीत मोठी वाढ झाली असून, लाखो रुपयांची उलाढाल झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

पन्नासहून अधिक खेड्यापाड्यांचे व्यापारी केंद्र असलेल्या या बाजारात सुकट, बोंबील, जवळा, मांदेली, ढोमेली, वाकटी, दांडी आणि बोंबली यांसारख्या विविध प्रकारच्या सुकी मच्छीची मोठ्या प्रमाणात विक्री होत होती. यामध्ये सुकट प्रतिकिलो ८०० ते १००० रुपये, बोंबील १२०० रुपये, वाकटी १००० रुपये, मांदेली ५०० ते ६०० रुपये, ढोमेली ६०० रुपये, जवळा ५०० ते ६०० रुपये, दांडी ५०० ते ६०० रुपये तर बोंबली ८०० रुपये प्रतिकिलो दराने विकली जात होती. मागील वर्षाच्या तुलनेत सुकी मच्छीचे दर वाढलेले असतानाही ग्राहकांचा उत्साह कमी झालेला दिसून आला नाही. उलट, पावसाळ्यातील गरज लक्षात घेऊन अनेकांनी मोठ्या प्रमाणात खरेदी केल्याचे दिसून आले. ग्राहकांची वाढती मागणी लक्षात घेऊन वसई, अर्नाळा, सफाळे, अगाशी, भाईंदर, उत्तन, पांचूबंदर आणि पालघर परिसरातील कोळी महिला मोठ्या संख्येने विक्रीसाठी बाजारात दाखल झाल्या होत्या. स्थानिक विक्रेत्यांनीही आकर्षक पद्धतीने दुकाने सजवून ग्राहकांचे स्वागत केले. दरम्यान, बाजारात झालेल्या प्रचंड गर्दीमुळे वाहतूक व्यवस्थेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. अनेक नागरिकांनी आपली कार, दुचाकी आणि रिक्षा थेट नाशिक महामार्गालगत उभी केल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण झाला. परिणामी प्रवाशांना कोंडीचा सामना करावा लागला. पडघा प्रवेशद्वाराजवळच हा बाजार भरत असल्याने अपघाताचा धोकाही वाढल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.स्थानिक नागरिकांनी आठवडा बाजारासाठी स्वतंत्र वाहनतळ, वाहतूक नियंत्रणासाठी विशेष पथक तसेच नियोजनबद्ध पार्किंग व्यवस्था उभारण्याची मागणी केली आहे. याबाबत पडघा ग्रामपंचायत आणि संबंधित प्रशासनाने तातडीने लक्ष घालून आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. एकंदरीत, पावसाळ्याच्या पूर्वतयारीसाठी सुकी मच्छी खरेदी करण्याकडे नागरिकांचा वाढता कल दिसून आला असून, पडघा आठवडा बाजाराने पुन्हा एकदा आपल्या व्यापारी महत्त्वाची आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेतील केंद्रस्थानी असलेली भूमिका अधोरेखित केली आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या मूर्ती संवर्धनाबाबत तज्ज्ञांकडून निरीक्षण; भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणामार्फत होणार संवर्धन

## पुढील आठवड्यात बैठक घेऊन होणार अंतिम निर्णय : जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या मूळ मूर्तीचे स्वरूप बदलू नये तसेच मूर्ती संवर्धनाबाबतची प्रक्रिया दीर्घकालीन टिकावी यासाठी मूर्ती संवर्धन तज्ज्ञांकडून निरीक्षण करून भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणामार्फत संवर्धन करण्यात येणार आहे .याबाबत पुढील आठवड्यात बैठक घेऊन निर्णय घेण्यात येईल, असे जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस. यांनी सांगितले.

श्री विठ्ठल व श्री रुक्मिणी मातेच्या मूर्तींच्या संवर्धनासंदर्भात मंदिर समिती, सल्लागार परिषद, स्थानिक महाराज मंडळी तसेच पुरातत्त्व विभागाच्या अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक दिनांक ५ जून रोजी दुपारी १२.३० वाजता श्री विठ्ठल-रुक्मिणी भक्त निवास येथे जिल्हाधिकारी तथा सल्लागार परिषदेचे पदसिद्ध सदस्य एस. कार्तिकेयन यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

श्री विठ्ठल व श्री रुक्मिणी मातेच्या मूर्तींना झीज होत असल्याने यापूर्वी भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्यामार्फत सन १९८८, २००५, २०१२ आणि २०२० मध्ये मूर्तींचे संवर्धन करण्यात आले होते. मागील संवर्धनास जवळपास पाच वर्षांचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर मूर्तींमध्ये पुन्हा काही प्रमाणात झीज होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

या पार्श्वभूमीवर भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागामार्फत मूर्तींची तपासणी करून अहवाल सादर करण्यात आला होता. सदर अहवालावर श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीच्या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली असून, संवर्धनासाठी शासनाची आवश्यक मंजुरी घेण्यात आली आहे. त्यानुसार पुढील कार्यवाहीसाठी आजची बैठक आयोजित करण्यात आली होती.

बैठकीस मंदिर समितीचे सह-अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, मंदिर समितीचे सदस्य, सल्लागार परिषदेचे सदस्य, स्थानिक महाराज मंडळी, पुरातत्त्व विभाग पुणे कार्यालयाचे अधिकारी तसेच भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभाग, छत्रपती संभाजीनगर येथील अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत श्री विठ्ठल व श्री रुक्मिणी मातेच्या मूर्तींच्या संवर्धनाची आवश्यकता, विशेषतः श्रींच्या चरणभागाची झालेली झीज, तसेच मूर्तींचे आयुष्य वाढविण्यासाठी आवश्यक असलेल्या संवर्धनात्मक उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी पुढील आठवड्यात भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाचे तज्ज्ञ अधिकारी, स्थानिक महाराज मंडळी, मंदिर समितीचे सदस्य, सल्लागार परिषद सदस्य तसेच विषयातील तज्ज्ञ व्यक्ती यांच्या उपस्थितीत मूर्तींचे प्रत्यक्ष निरीक्षण करण्यात येणार आहे. त्यानंतर आवश्यक संवर्धनात्मक उपाययोजना निश्चित करून भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्यामार्फत मूर्तींचे संवर्धन करण्यात येणार आहे.

मूर्ती संवर्धनाची संपूर्ण प्रक्रिया पुरातत्त्व विभागाच्या तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली व शास्त्रोक्त पद्धतीने पार पाडण्यात येईल, अशी माहिती मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

## पंढरपूर परिसरात भुरट्या चोरांचा सुळसुळाट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर शहर व उपनगरामध्ये चोरट्यांनी धुमाकूळ घातला आहे. नागरिकांच्या अंगावरील व घोरपड्याचे प्रमाण वाढले आहे यामुळे नागरी मध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलिसांनी उपनगरामध्ये गस्त वाढवावी अशी नागरिकांतून मागणी होत आहे.

उन्हाळी सुट्टी असल्यामुळे रुक्मिणी नगर मधील राजीव कुलकर्णी हे घराला कुलूप लावून परगावी गेले होते. ही संधी साधून चोरट्याने एक जून रोजी घराची कुलूप तोडून रोग दहा हजार रुपये दहा हजार किमतीच्या चांदीच्या वस्तू अशा एकूण २० हजाराचा मुद्देमाल नापास केला. कुलकर्णी परगाहून आल्यानंतर त्यांना ही घटना घडल्याचे लक्षात आले. त्यांनी याबाबत पंढरपूर शहर पोलीस ठाण्यात चोरट्या विरोध फिर्यादी दाखल केली आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक गोसावी करीत आहे. अधिक मास असल्यामुळे पंढरपूरमध्ये येण्याचे भाविकांची संख्या वाढली आहे त्यामध्ये एसटी बस स्थानक, श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर , परिसर, चंद्रभागा वाळवंट, दर्शन रांग आधी ठिकाणी भाविकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होत आहे. या गरजेचा फायदा घेऊन छोट्या वरून अंगावरचे दागिने व पर्समधील लंपास करण्याच्या घटना घडत आहे त्यामुळे येणाऱ्या भाविकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. तरी पोलिसांनी करडी नजर ठेवून चोरट्यांना जेरबंद करावे अशी भाविकांमधून मागणी होत आहे.

# स्वेरीमध्ये जागतिक पर्यावरण दिन उत्साहात साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरी संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मध्ये 'जागतिक पर्यावरण दिना'निमित्त वृक्षारोपण हा उपक्रम उत्साहात संपन्न झाला. यामध्ये विविध प्रकारच्या रोपट्यांची लागवड करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.



शुक्रवार, दि. ५ जून २०२६ रोजी स्वेरीचे संस्थापक व प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने हा उपक्रम घेण्यात आला. यावेळी स्वेरी कॅम्पसमध्ये रोपट्यांची लागवड करून पर्यावरण संरक्षणाची सामाजिक बांधिलकी जपण्यात आली. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून इस्कॉन, कोल्हापूर येथील पुरुषोत्तम आनंददास महाराज तसेच केरले (जि. कोल्हापूर)मधील हनुमान हायस्कूलचे रणदिवे व आदी उपस्थित होते. त्याचबरोबर स्वेरी संचलित कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. मिथुन मणियार, डी. फार्मसीचे प्राचार्य डॉ. सतीश मांडवे, प्रशासन अधिष्ठाता डॉ. रणजित गिड्डे, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंगचे विभागप्रमुख डॉ. एन. ए. तळवलकर, कॉम्प्यूटर सायन्स अँड इंजिनिअरिंगच्या डॉ. वनिता जाधव, मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे विभागप्रमुख डॉ. संदीप वांगीकर आणि एमबीएच्या डॉ. मिनल भोरे, ग्रीन टीमचे समन्वयक प्रा. कुलदीप पुकाळे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. अमोल चौंडे तसेच प्राध्यापकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमाच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धन, वृक्षसंवर्धन आणि हरित परिसर निर्मितीचे महत्त्व पटवून देण्यात आले. यावेळी उपस्थितांनी वृक्षांचे संगोपन करण्याची प्रतिज्ञा घेत पर्यावरण संरक्षणासाठी कटिबद्ध राहण्याचा संकल्प केला. 'जागतिक पर्यावरण दिना'निमित्त आयोजिलेल्या या उपक्रमामुळे पर्यावरणाबाबत जनजागृती होण्यास तसेच हरित भविष्याच्या निर्मितीस चालना मिळणार आहे, हे मात्र नक्की.

**स्वेरीचा संपूर्ण कॅम्पस हा 'ग्रीन कॅम्पस' म्हणून ओळखला जातो. भारताचे ज्येष्ठ अणूशास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर यांनी स्वेरीच्या प्रांगणात लावलेल्या झाडांचे आजही संगोपन केले जात आहे. स्वेरीत आजपर्यंत सुमारे आठ हजार झाडे लावण्यात आलेली आहेत.**

# निफाडला पेट्रोल डिझेल दरवाढीबाबत काँग्रेसचे आंदोलन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : पेट्रोल डिझेल दरवाढ कमी व्हावी व पेट्रोल पंपावरील इंधनाची टंचाई दूर व्हावी यासाठी निफाड तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने निफाड येथील कापसे पेट्रोल पंपावर आंदोलन केले , पेट्रोल डिझेलची दरवाढ कमी करावी यासाठी तहसीलदा यांना निवेदन देण्यात आले आहे

वाढलेल्या पेट्रोल डिझेल दरवाढीमुळे शेतीचे उत्पादन खर्च, वाहतूक खर्च वाढला असून जीवनावश्यक वस्तू ही मागल्या आहेत जनतेवर याचा मोठा आर्थिक भार पडत असून दरवाढीमुळे शेतीची कामे खोळंबली आहे, शेतीची कामे वेळेवर पूर्ण झाली नाही तर अन्नधान्य उत्पादनावर याचा परिणाम होईल तरी डिझेल पेट्रोलचे झालेले टंचाई सुरळीत करून वाढलेली दरवाढ कमी करावी व शेतकरी वर्गाला, जनतेला केंद्र शासनाने दिलासा द्यावा असी काँग्रेस कमिटीच्या वतीने मागणी करण्यात आली आहे

याप्रसंगी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष राजाराम पानगव्हाणे, नाशिक जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष भारत टाकेकर ,रमेश कहांडोळे, सरचिटणीस सचिन होळकर, कार्याध्यक्ष साहेबराव ढोमसे,दिगंबर गीते, मधुकर शेलार, अन्वर शेख ,रंगनाथ मोरे, नंदकुमार निकाळे, प्रकाश अडसरे संघटन सचिव, रफिक तांबोळी, मधुसूदन आव्हाड, सुयोग पगारे, राजेश लोखंडे, सोमनाथ शिंदे, रोहिणी शेळके, शकीलभाई शेख, संपत ढोमसे, विजय बावके, विजय वाबळे अधिक काँग्रेस कमिटीचे कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते या सर्वांच्या वतीने तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले आहे






## वादळी वाऱ्यामुळे घरांची पडझड होऊन आर्थिक नुकसान

# अवकाळी पावसामुळे डाळिंब, पेरू बागांचे नुकसान; त्वरित पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत द्यावी : आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सांगोला : सांगोला तालुक्यातील जुजारपूर, सोमेवाडी, गौडवाडी, बुद्धेहाळ, जुनोनी, करांडेवाडी, तिप्पेहळ्ळी, कोळा, ह.मंगेवाडी, गुणापवाडी, हतीद, सावे, सोनंद, चोपडी, नवी लोटेवाडी, किडेबिसरी तसेच सांगोला शहरात झालेल्या अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्यामुळे घरांची पडझड होऊन आर्थिक नुकसान तसेच डाळिंब, पेरू व इतर फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या बागांचे तातडीने पंचनामे करून शासनाकडून आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी केली आहे.



गेल्या काही दिवसांपासून तालुक्यात अवकाळी पाऊस, ढगाळ वातावरण व वादळी वारे सुरू असल्याने फळबागांना मोठा फटका बसला आहे. विशेषतः डाळिंब आणि पेरू उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून अनेक ठिकाणी फळगळ, फळांना तडे जाणे, डाग पडणे तसेच उत्पादनाच्या गुणवत्तेवर परिणाम झाल्याचे दिसून येत आहे.

सांगोला तालुका हा डाळिंब आणि पेरू उत्पादनासाठी राज्यात ओळखला जातो. हजारो शेतकरी या फळबागांवर अवलंबून असून मोठ्या खर्चातून त्यांनी बागा जोपासल्या आहेत. मात्र ऐन उत्पादनाच्या काळात अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

याबाबत आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी प्रशासनाने तात्काळ नुकसानग्रस्त भागांची पाहणी करून वस्तुनिष्ठ पंचनामे करावेत तसेच शासनाने विशेष मदत जाहीर करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी केली आहे. कृषी व महसूल विभागाने संयुक्त सर्वेक्षण करून नुकसानाचा अहवाल तातडीने शासनाकडे पाठवावा, असेही त्यांनी नमूद केले.

सांगोला तालुक्यातील अर्थव्यवस्थेमध्ये डाळिंब आणि पेरू उत्पादनाचा मोठा वाटा असून हजारो शेतकरी या फळबागांवर अवलंबून आहेत. त्यामुळे अवकाळी पावसामुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना शासनाने त्वरित मदतीचा हात देऊन दिलासा द्यावा, अशी अपेक्षा तालुक्यातील शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे.

## ड्रिप क्लिनिंगच्या कामांबाबत नागरिकांकडून प्रश्नचिन्ह

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर/केतन भोज ; बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एन विभागातील विक्रोळी पार्कसाईट, रामनगर, राहूल नगर, डकलाईन, सेवा नगर, भीम नगर मध्ये ड्रिप क्लिनिंगच्या कामांसाठी ठेकेदार संस्थांची नियुक्ती करण्यात आली असल्याचे सांगितले जात असले,तरी प्रत्यक्षात अनेक ठिकाणी ड्रिप क्लिनिंगची कामे होताना दिसत नसल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून केला जात आहे.स्थानिकांच्या म्हणण्यानुसार ड्रिप क्लिनिंगसाठी ठेकेदार संस्था नेमली असूनही प्रत्यक्षात कामे दिसत नाहीत.मग ही योजना नेमकी ठेकेदारांसाठी आहे की नागरिकांसाठी? असा सवाल स्थानिक नागरिकांनी उपस्थित केला आहे.स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, अनेक भागांमध्ये नाले, गटारे ड्रिप क्लिनिंग संबंधित कामे नियमित विभागात स्वच्छता होत नसल्याने पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर चिंता व्यक्त केली जात आहे. ड्रिप क्लिनिंगसारख्या योजनांवर महापालिकेकडून मोठ्या प्रमाणात खर्च होत असताना त्याचा प्रत्यक्ष फायदा नागरिकांना मिळत आहे का, याबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत.दरम्यान, या विषयावर मनपा एन विभागाच्या घन कचरा व्यवस्थापन विभागाने संबंधित कामांची माहिती, कामाचे वेळापत्रक तसेच ठेकेदार संस्थांना देण्यात आलेल्या जबाबदाऱ्यांची माहिती सार्वजनिक करावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून केली जात आहे. पावसाळा तोंडावर असताना ड्रिप क्लिनिंग योजनेच्या संबंधित कामांची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक असल्याने, प्रशासनाने या तक्रारींची दखल घेऊन वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# आमदार अभिजीत पाटील वादळी वाऱ्यामुळे नुकसान पिकांची पाहणी करून शेतकऱ्यांना दिला आधार

## मतदारसंघातील वडोली, आढेगाव, चांदज, टाकळी टें, गारअकोले, आलेगाव बु. येथे भेटी दिल्या.



पंढरपूर : अचानक झालेल्या वादळी वाऱ्यामुळे केळी, डाळिंब यांसह अनेक पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून शेतकऱ्यांच्या हाता-तोंडाशी आलेला घास या अस्मानी संकटामुळे हिरावला गेल्याने बळीराजा मोठ्या संकटात सापडला असल्याचे आमदार अभिजीत पाटील यांनी सांगितले..

नुकसानग्रस्त शेतकरी बांधवांशी संवाद साधून त्यांना धीर देत आज सकाळपासून आमदार पाटील हे अधिकाऱ्यांना सोबत घेऊन नुकसान झालेल्या सर्व शेतकऱ्यांचे पंचनामे करून सरकारकडे सादर करावेत, अशा सूचना दिल्या आहेत.

# कोर्टी येथे 'फाटे ट्रॅक्टर्स' तर्फे शिवराज्याभिषेक दिन उत्साहात साजरा!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कोर्टी/प्रतिनिधी : येथील 'फाटे ट्रॅक्टर्स' मध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक दिन (शिवराज्याभिषेक सोहळा) अत्यंत उत्स-ाहात आणि भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. याप्रसंगी शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांच्या दैदिप्यमान इतिहासाला उजाळा देण्यात आला.




या सोहळ्याला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) उद्योग व व्यापार विभागाचे श्री. नागेश फाटे प्रामुख्याने उपस्थित होते.

त्यांच्यासोबतच निवृत्ती भटकर, संतोष पुणेकर, ओंकार कथले, बेबन आदमीले, समाधान बागल, लखन मोरे, निलेश घोडके, वैभव तारळेकर, ऋषिकेश बागल आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना श्री. नागेश फाटे म्हणाले की, छत्रपती शिव-ाजी महाराजांचा राज्याभिषेक हा अठरापगड जातीच्या जनतेला हक्काचे स्वराज्य मिळवून देणारा सुवर्णक्षण होता. त्यांचा पराक्रम, व्यवस्थापन आणि दूरदृष्टी आजही प्रत्येक उद्योजक आणि नागरिकासाठी प्रेरणादायी आहे.

कार्यक्रमाला परिसरातील नागरिक, शिवप्रेमी आणि फाटे ट्रॅक्टर्सचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# उपजिल्हा रुग्णालय निफाड येथे 'स्त्री जन्माचे स्वागत करा' जनजागृती कार्यक्रम संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : उपजिल्हा रुग्णालय निफाड , ग्रामीण रुग्णालय लासलगाव व ग्रामीण रुग्णालय पिंपळगाव बसवंत यांच्या संयुक्त विद्यमाने पंचायत समिती निफाड येथील हॉल मध्ये कन्या भ्रूणहत्या प्रतिबंध, मुलींच्या जन्माचे स्वागत आणि स्त्री-पुरुष समानतेबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने 'स्त्री जन्माचे स्वागत करा' या विषयावर विशेष जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन हे आंतरराष्ट्रीय नोबेल पीस अवॉर्डसाठी नामांकित स्त्री जन्माचे स्वागत करा चळवळीच्या आद्यप्रवर्तक पी सी पी एन टी स्टेट सुपरव्हिजरीबोर्ड मेंबर डॉ सुधा कांकरिया यांच्या प्रमुख उपस्थित आयोजित करण्यात आला. सद-रील कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मधुकर शेलार उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात धन्वंतरी मातेच्या पूजनाने तसेच दीपप्रजलन करून करण्यात आली होती. यानंतर उपजिल्हा रुग्णालय निफाड येथील कार्यरत वैद्यकीय अधिक्षक डॉ राजीव तांभाळे यांनी कार्यक्रम ाची प्रस्तावना केली तर डॉ सुधा कांकरिया यांनी मुलींचे शिक्षण, सक्षमीकरण, बालविवाह प्रतिबंध, गर्भलिंग निदानावरील कायदेशीर बंदी तसेच 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' अभियानाचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले . स्त्री भ्रूणहत्या रोखण्यासाठी समाजा-तील प्रत्येक घटकाने सकारात्मक भूमिका घेण्याचे आवाहन करण्यात आले.

कार्यक्रमादरम्यान उपस्थित सर्व आशा वर्कर, अंगणवाडी कार्यकर्ती , आशा व अंगणवाडी सुपरवायझर व आरोग्य, शिक्षण विभागातील कर्मचारी यांना माहितीपत्रकांचे वितरण करण्यात आले. मुलींच्या जन्माचे स्वागत करून त्यांना समान संधी देण्याचा संदेश देण्यात आला. स्त्री जन्माबाबत समाजामध्ये अस-लेले गैरसमज दूर करून मुलींच्या शिक्षण व आरोग्याला प्राधान्य देण्याची गरज यावेळी अधोरेखित करून मुलींसाठी विविध योजना बाबत माहिती दिली...११ कलमी कृती कार्यक्रम सादर करण्यात आला त्यात आपल्या परिसरातील ० ते ६ वयोगटातील मुला मुलींच्या संख्येचा अभ्यास करावा, ग्रामीण भागात ग्रामसभा, शहरी भागात वार्ड सभा घेऊन स्त्री जन्माचे स्व-ागताचा ठराव घ्यावा, कन्याजन्माचे आनंद सोहळा आयोजित करावे, गावातील व वॉर्डातील ज्याच्या घरी फक्त मुली आहेत अशा परिवाराचेसन्मान करावा, मुलगा म्हणजे वंशाचा दिवा व मुलगी म्हणजे पराया धन ही मानसिकता बदलण्याची गरज आहे, जी मुलगी नकोशी आहे ती आपल्याला का हवीशी याबाबत माहिती दिली, लग्न करताना आठवा फेरा स्त्री जन्माच्या स्वागताचा घ्यावा असे आवाहन केले, समाजात साम ुदायिक डोहाळे जेवणाचे आयोजन करून स्त्री जन्माचे स्वागत व कुपोषणमुक्त भारत करण्याविषयी प्रबोधन करावे, सोनोग्राफी मशीन शाप की वरदान बाबत सविस्तरपणे माहिती व चर्चा केली.





याप्रसंगी जिल्हा रुग्णालय नाशिक येथील ड.सुवर्णा शेप-ाळे, ग्रामीण रुग्णालय लासलगाव येथील कार्यरत वैद्यकीय अधीक्षक डॉ. बाळकृष्ण अहिरे, ग्रामीण रुग्णालय पिंपळगाव बसवंत येथील कार्यरत वैद्यकीय अधिक्षक डॉ नागनंदा मगरे, उपजिल्हा रुग्णालय रुग्ण कल्याण सहनियंत्रण समिती सदस्य मधुकर शेलार, सागर कुंदे पाटील, दिलीप आबा कापसे, श्रीमती सुवर्णा लुक्कड, डॉ निलेश लाड, तालुका आरोग्य अधिकारी डॉ सुजित कोशिरे, मेट्रन दाभाडे मॅडम, इन्चार्ज सिस्टर जाधव मॅडम, कनिष्ठ लिपीक दिगंबर चरापले, सर्व आर बी एस के टीम, समुपदेशक नितीन परदेशी, सुनील राठोड, संदीप राऊत, अधिपरिचारिका, आरोग्य कर्मचारी, आशा स्वयंसेविका, अंगणवाडी कार्यकर्ती तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम ाच्या शेवटी उपस्थितांनी स्त्री भ्रूणहत्या न करण्याची व मुलींच्या जन्माचे स्वागत करण्याची शपथ घेतली. तसेच सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ दिनेश भामरे, प्रम ुख पाहुण्याचे परिचय डॉ सुनीता डेपले व आभार प्रदर्शन डॉ सुजित कोशिरे यांनी केले.

सदर कार्यक्रमामुळे समाजात मुलींबाबत सकारात्मक दृष्टीकोन निर्माण होण्यास मदत होईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.



# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त मुख्य डाकघर, सोलापूर येथे वृक्षारोपण व स्वच्छता अभियान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : जागतिक पर्यावरण दिनानिमित्त प्रवर अधीक्षक डाकघर, सोलापूर विभाग आणि मुख्य डाकघर, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी सोलापूर मुख्य डाकघर परिसरात वृक्षारोपण व स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले. सकाळी ८ ते १० या वेळेत झालेल्या या कार्यक्रमात पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत विविध देशी वृक्षांची लागवड करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात स्वच्छता अभियानाने करण्यात आली. यावेळी सोलापूर शहराच्या उपमहापौर तथा पर्यावरण रक्षक सौ. ज्ञानेश्वरी महेश देवकर प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. डॉ. मनोज देवकर, संस्थापक - इको नेचर क्लब, आणि सौ. वर्षा खडकेकर हे विशेष अतिथी म्हणून उप-स्थित होते .

यावेळी प्रमुख पाहुणे, प्रमुख अतिथी तसेच गार्डनर श्रीमती रमा गायगवळी यांचा नॅपकिन बुके देऊन सत्कार करण्यात आला. प्रमुख पाहुणे व अतिथींनी पोस्ट ऑफिसला २० विविध जातींच्या देशी वृक्षांची भेट दिली. त्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. तसेच डाक कर्मचाऱ्यांनी पोस्ट ऑफिस परिसरात आणखी १५ विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड केली.

आपल्या मार्गदर्शनपर भाषणात सौ. ज्ञानेश्वरी देवकर यांनी मुख्य डाकघर परिसरात करण्यात आलेल्या वृक्षारोपणाची, त्याच्या योग्य निगेची व परिसरातील स्वच्छता अभियानाची प्रशंसा केली. तसेच मुख्य डाकघराच्या हेरिटेज इमारतीची पाहणी करून समाधान व्यक्त केले. कर्मचारी व ग्राहकांच्या सुविधांसाठी ओपन जिम तसेच महिला कर्मचारी व ग्राहकांसाठी हिरकणी कक्ष उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे त्यांनी सांगितले.

मनोगत व्यक्त करताना सौ. हर्षरेखा शाईवाले यांनी मुख्य डाकघरात झालेल्या विविध सुधारणा, स्वच्छता व कार्यक्रमाच्या उत्कृष्ट नियोजनाबद्दल कौतुक केले.

अध्यक्षीय भाषणात श्री. हेमंत खडकेकर यांनी कर्मचारी कल्याणासाठी सुधारित मनोरंजन कक्ष, प्रशिक्षण केंद्र, स्वच्छ कार्यालयीन परिसर आणि निसर्गरम्य वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी विभाग सातत्याने प्रयत्नशील असल्याचे सांगितले. कार्यक्रमास श्री. सोमनाथ काळे (वरिष्ठ डाकपाल, सोल-ापूर मुख्य डाकघर), श्री. प्रफुल्ल बंगाले (सहाय्यक अधीक्षक), श्री. संदीप घोडके (सहाय्यक अधीक्षक), श्री. रा-हुल शिंत्रे (तक्रार निवारण अधिकारी), श्रीरंग रेगोटी लेखापाल तसेच सोलापूर डाक विभागाचे सर्व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्री. जे. आर. नरुटे यांनी केले. चहा-बिस्किटांसह कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## स्वेरीमध्ये ३५३ वा 'शिवराज्याभिषेक दिन' उत्साहात साजरा

# सकारात्मक विचार केल्याने भविष्यात फायदा : सचिव डॉ. सुरज रोंगे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : 'छत्रपती शिव-ाजी महाराजांच्या विचारांमुळे, शौर्यामुळे, परीश्रमांमुळे आणि योगदानामुळे आज आपण चांगले आयुष्य जगत आह-ेत. महाराजांचे राष्ट्रनिर्माणातील योगदान, स्वराज्याची संकल्पना विचारात घेऊन युवकांनी सम ाजहितासाठी कार्य करण्याची आवश्यकता आहे. छत्रपती शिवरायांचे विचार आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी आहेत. त्यांच्या कार्याचा आदर्श घेऊन समाजसेवा, राष्ट्रप्रेम आणि सामाजिक बांधिलकी जपण्याची गरज आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे कष्ट, गुणग्राहकता, न्याय-निवाडा, नेतृत्व, परिश्रम, वैज्ञानिक दृष्टिकोन, लोकाभिमुख प्रशासन अशा विविध गुणांचे परीक्षण करता विश्वात त्यांचा आदर्श घेतला जातो. एकूणच सकारात्मक विचार केल्याने सर्वांची प्रगती होत असते.' असे प्रतिपादन स्वेरीचे सचिव डॉ. सुरज रोंगे यांनी केले.




स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) चे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांच्या दिशादर्शक मार्गदर्शनाखाली, गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरी संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (पदवी व पदविका) व कॉलेज ऑफ फार्मसी (पदवी व पदविका) मधील राष्ट्रीय सेवा योजना व क्रिडा विभागाच्या वतीने स्वेरीमध्ये ३५३ वा 'शिवराज्याभिषेक दिन' तथा 'शिवस्वराज्य दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. प्रारंभी भव्य शिवमुर्तीचा दुग्ध अभिषेक व पूजन संस्थेचे सचिव डॉ. सुरज रोंगे यांच्या हस्ते करण्यात आले. यानंतर उपस्थितांनी 'शिवप्रतिज्ञे'चे सामूहिक वाचन करून शिवरायांच्या आदर्शांचे पालन करण्याचा संकल्प केला. इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंगच्या विभागप्रमुख डॉ. नीता तळवलकर यांनी 'शिवराज्याभिषेक दिना'चे महत्व सांगून छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्यावर प्रकाश टाकला. पुढे स्वेरीचे सचिव डॉ. सुरज रोंगे यांनी आपल्या अभ्यासपूर्ण भाषणातून छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्यावर प्रकाश टाकून त्यावेळची स्थिती व आजची परिस्थिती याबाबत विश्लेषण केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, अधिष्ठाता, विभागप्रमुख, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. अमोल चौंडे यांच्यासह प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, पालक वर्ग आदी उपस्थित होते.

# पूर्वसंमती रखडल्यामुळे सिंदखेडराजा तालुक्यातील शेतकरी त्रस्त; तालुका कृषी अधिकाऱ्यांवर दुर्लक्षाचा आरोप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : सिंदखेडराजा : कृषी विभागाकडून विविध योजनांसाठी आवश्यक असले-ली पूर्वसंमती (झीश-डरपल-ींळेप) वेळेत मिळत नसल्याने सिंदखेडराजा तालुक्यातील अनेक शेतकरी अडचणीत सापडले आ-हेत.पूर्वसंमती न देण्यामागे नक्कीच गोडबंगाल दडला असावा छोटया छोट्या तांत्रिक कारणासाठी व छोट्या छोटया बाबीसाठी ऐन पावसाळ्याच्या तोंडावर मात्र शेतकऱ्यान कडून आर्थिक देवाण घेवाण होत नसल्याने शेतकऱ्याची पिळवणूक व हेळसांड होत असल्याची दाट चर्चाला तालुक्यातील कास्तकारांकडून होत आहे आणि अनेक शेतकऱ्यांची कृषीविषयक कामे रखडली असून आर्थिक नुकसान सहन करावे लागत असल्याची तक्रार शेतकरी वर्गातून होत आहे.




शेतकऱ्यांनी संबंधित कागदपत्रे सादर करूनही अनेक प्रस्ताव महिनोनमहिने प्रलंबित असल्याचा आरोप आहे तरी याचे प्रयोजन काय साहेब आम्ह-ाला कळावे कृषी विभागाच्या दिरंगाईमुळे ठिबक सिंचन, तु-षार सिंचन, कृषी यंत्रसामग्री अशे लाखो रुपयाचे अनुदानच्या योजना शासन शासन स्तरावरून अंमलबजावणी करते मात्र संबंधित अधिकारी हे प्रत्यक्षात ग्रामस्तरा-वर प्रामाणिकपणे राबवितात का त्याच्या हितासाठी आर्थिक देव-ाण घेवाण झाल्या शिवाय फाईल किंवा जपश्रळपश ची कामे पुढे सरकतच नाहीत तसेच त्यांच्या कामात हलगर्जीपणा किंवा कर्तव्यात कसूर असौम्यपणा होत असल्याने तसेच इतर शासकीय योजनांचा लाभ वेळेत मिळत नसल्याने मात्र शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण होत असून शासनाच्या योजना कुचकामी ठरत असून संबंधित अधिकारी यांच्या या बाबींमुळे कृषीविभागाची जगभरात विश्वासनीय स्वच्छ, प्रांजळ,प्रतिमा मात्र मलिन होत चालली आहे

तालुका कृषी अधिकारी यांचे या प्रकरणाकडे हेतूपुरस्कार दुर्लक्ष होत असल्याचा आरोप शेतकरी संघटनांनी केला आहे. वारंवार पाठपुरावा करूनही सम ाधानकारक उत्तर मिळत नसल्याने शेतकऱ्यांना कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागत असल्याची खंत व्यक्त करण्यात येत आहे.

शेतकऱ्यांना प्रलंबित पूर्वसंम ती प्रस्तावांना तातडीने मंजुरी द्यावा अन्यथा ०७ दिवसात पूर्वसंमती मिळाली नाही तर संबंधित अधिकाऱ्यांच्या कामकाजाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी प्रशासनाकडे केली जाणार असून आंदोलनाचा इशारा देखील शेतकरी संघटनांकडून देण्यात आला आहे.

दरम्यान, या प्रकरणी कृषी विभागाकडून अधिकृत भूमिका समोर आलेली नसून, शेतकऱ्यांच्या समस्या तातडीने सोडविण्याची मागणी जोर धरत आहे.